**ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION**

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**माहिती तंत्रज्ञान विभाग**

जा.क्र.उमपा/मातंवि/५१०/२०२२
दिनांक:- २६/०८/२०२२

## निविदा सुचना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नियोजित सण उत्सव कालावधीमध्ये निर्देशित ठिकाणी सी.सी.टि.व्हि. कॅमेरे भाडेतत्वावर उपलब्ध होणेबाबत सिलबंद दोन लिफाफा पध्दतीनुसार लिफाफा (१) तांत्रिक (२) वाणिज्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मागविण्यात येत आहे. निविदा सादर करण्या अगोदर साहित्य/कामाविषयी पुर्ण माहिती ही माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. २७२०११६ वरुन प्राप्त करुन घ्यावी व सर्व बाबीची शहानिशा/खात्री करुन निविदा सादर करावी.

**अटी व शर्ती:-**

उपरोक्त काम अत्यंत महत्वाचे व कालबध्द कामाची सिलबंद निविदा दोन लिफाफयामध्ये माहिती तंत्रज्ञान विभाग उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय, उल्हासनगर-३ येथे दिनांक:- ३०/०८/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यत स्विकारली जातील. स्विकारलेल्या निविदा दिनांक ३०/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत उघडण्यात येतील आपण स्वत: किंवा आपल्या स्वाक्षरीने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी उपस्थित रहावे.

**लिफाफा क्र. १ (तांत्रिक) :-**

- निविदेसोबत अनामत रक्कम EMD स्वरुपात भरणा करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत धारकाने काम पुर्ण केलेल्याचे प्रमाणपत्र/कार्यादेशाची (Self Attested) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत (G.S.T) नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत (PAN No.) नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोब संस्था नोंदणी प्रमाणपत्र उदा. शॉप लायसन्स अधिनियम अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र/पार्टनरशीप ॲक्ट अंतर्गत पार्टनरशीप डिड/कंपनी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत कंपनी/भारत सुक्ष्म लघु मध्यम मंत्रालय अंतर्गत उद्योग आधार प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन (Self Attested) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत EPFO/ESIS चे नोंदणी प्रमाणपत्र (Self Attested) सादर करणे आवश्यक आहे.
- निविदेसोबत सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्र. २ (वाणिज्य):-**

- कामाचे/साहित्याचे दर अस्तित्वात असलेल्या सर्व करांसह लेटरपॅडवर सादर करावे.
- निविदा धारकाने विद्युत साहित्य/कामासंदर्भातील घोषणापत्र प्राप्त करुन सादर करणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटी :-**

- सादर करण्यात आलेले दर ६० दिवसापर्यंत वैध राहतील.
- यशस्वी निविदाधारकाची सुरक्षा रक्कम ५% (SD) देयकातुन वजा करण्यात येईल.
- कोणतील अट घातलेले निविदा ग्राहय धरले जाणार नाही, रदद करण्यात येतील.
- कोणतेही कारण न देता सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सगळे निविदा स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा हक्क राखुन ठेवला आहे.

**मा.उपायुक्त (मातंवि)**
**उल्हासनगर महानगरपालिका**

प्रत:-

१) सुरक्षा अधिकारी,सुरक्षा विभाग, उमपा यांनी सदर सुचना नोटीसबोर्डवर प्रसिध्द करावी.
२) माहिती तंत्रज्ञान विभाग, उमपा यांनी सदर सुचना वेबसाईटवर प्रसिध्द करावी.